21 NOV 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Digital photocopies of answer sheets on cards

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will provide digital photocopies of answer sheets to students from this semester onwards, informed director board of examinations and evaluation Mahesh Kakade on Monday.

The said initiative will be experimented at first with the B Pharma and M Pharma students as the number of students opting for photocopies in these courses are subsequently low.

Kakade told **TOI**, "The earlier system of manually delivering photocopies of the answer sheets demanded by students used to take many days and had several flaws. One of the main flaws was answer sheets would take weeks to reach the candidates via post or got lost during the transit.

Hence, according to Kakade, the digital photocopies will straightaway cut out the chances of students not getting their photocopies. "The photocopies could be delivered on the email address of the students and it would be convenient for them to take the print out or check it out online," he said.

File Photo



A candidate can apply for photocopy for maximum two subjects

He added that a mobile unit will be formed for the said activity that will track photocopies from the respective Centralised Assessment Programme (CAP) centre and send the digital version in a pdf file format to the students.

Kakade said the initiative is being launched on pilot basis first, wherein a third party, an IT company, will execute and monitor the digital photocopy delivery process.

"We would like to know whether the idea—fabulous on paper—can be delivered in real life as well. Are there any flaws or the system could work for other faculties as well," he said.

An official from the exam department said after the result, candidate can apply for photocopy for maximum two subjects, if he/she feels there is a chance of change in the final result. This generally costs Rs 150 per subject.

The official added that candidate, can apply for re-evaluation, for which Rs 500 per subject fee is charged. Grievance redressal committee of respective subject assesses the said answer sheet, based on which the marks are either changed or not recommended for re-evaluation. The whole process takes at least two months to complete.

It should be noted that the SUK receives over 15,000 photocopy requests every semester for various exams, but the major applications come from the engineering faculty. In fact, the results of the students have been delayed in past due to delay in the students receiving their photocopies.

## Varsity inks MoU with Infosys

The Shivaji University, Kolhapur (SUK) signed a memorandum of understanding (MoU) with Infosys earlier last week. According to SUK officials, the MoU will help in orgainsing skill development workshops and expert lectures for students and faculty members.

A SUK official said skill and entrepreneurship development centre of the SUK in association with the Infosys had organised a faculty development programme earlier this month in which around 45 faculty members had participated. On the last day of the programme, on November 16, the MoU was signed. According to varsity officials, many such events and workshops are scheduled in the remaining academic year for the development of students and faculty members.

2 1 NOV 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठावर 'विकास आघाडी'चा झेंडा

## विकास आघाडी १७, सुटा ६, अपक्ष १ जागा : एका अभ्यास मंडळावर सर्व संघटनांना समान जागा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या (सिनेट) निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. दुपारी तीन वाजता अभ्यास मंडळ व शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचा निकाल जाहीर झाला. यापूर्वी सर्वच अभ्यास मंडळांवर सुटाचे वर्चस्व होते. यावर्षी रयत शिक्षण संस्था आणि विवेकानंद शिक्षण संस्था या विद्यापीठ विकास आघाडीमध्ये समाविष्ट झाल्या होत्या. त्यामुळे अभ्यास मंडळावर विकास आघाडीने 'सुटा'ची मक्तेदारी मोडीत काढून आपले वर्चस्व प्रस्तापित केले.



शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळाची निवडणूक कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील ३३ केंद्रांवर पार पडली. ७२ जागांसाठी १५६ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. मतमोजणी सोमवारी पहाटेपर्यंत सुरू होती. प्राचार्य प्रतिनिधी, अधिसभा शिक्षक, अधिसभा विद्यापीठ शिक्षक, अधिसभा नोंदणीकृत पदवीधर, विद्यापरिषद शिक्षक, अभ्यास मंडळे या मतदारसंघासाठी निवडणूक पार पडली. यापूर्वी ६ संस्था प्रतिनिधी, ९ प्राचार्य व १० अभ्यास मंडळांची निवडणूक बिनविरोध झाली होती.

४७ अभ्यास मंडळापैकी १२ अभ्यास मंडळांवर मतदार नसल्याने या मंडळांचा निर्णय कुलगुरु घेणार आहेत. उर्वरित ३३ अभ्यास मंडळांपैकी ८ अभ्यास मंडळांसाठी उमेदवार नसल्याने २५ अभ्यास मंडळासाठी निवडणूक लागली होती. यामध्येही निवडणुकीपूर्वीच १० अभ्यास मंडळे बिनविरोध झाली. त्यामुळे १५ अभ्यास मंडळासाठी निवडणूक झाली. सोमवारी झालेल्या मतमोजणीत विद्यापीठ विकास आघाडीने ७, सुटाने ६, अपक्ष १, आणि एका जागेवर प्रत्येक संघटनेचा एक अशी समान मते मिळाली. बिनविरोध झालेल्या अभ्यास मंडळाचा विकास आघाडीला मोठा फायदा झाला आहे.

प्राचार्य गटामध्ये यापूर्वीच ८ जागा बिनविरोध झाल्या आहेत.

पान ६ पहा

### रात्री उशिरा सर्वच विकास आघाडीच्या नेत्यांची उपस्थिती

सोमवारी दिवसभर सुरू असलेल्या मतमोजणीला ठराविक कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र, रात्री दहानंतर नोंदणीकृत पदवीधर, महाविद्यालयीन शिक्षक आणि ॲकॅडमिक कौन्सिलची मतमोजणी सुरू झाली. यामध्ये चुरशीची लढत असल्याने विकास आघाडीचे संजय डी. पाटील, प्रताप ऊर्फ भैय्या माने, डॉ. डी. आर. मोरे, शंकरराव कुलकर्णी, डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्यासह आघाडीच्या नेत्यांनी मतमोजणीच्या ठिकाणी गर्दी केली होती. याप्रसंगी सर्वच जागांवर आपले उमेदवार निवडून येणार असल्याचा दावा आघाडीच्या नेत्यांनी केला.

# विद्यापीठावर 'विकास आघाडी'चा झेंडा

पान १ वरुन

एका जागेसाठी चंद्रशेखर कारंडे व सखाराम शिंगटे यांच्यात लढत झाली. या जागेवर विकास आघाडीच्या चंद्रशेखर कारंडे यांनी विजय मिळवीला. त्यांना ११५ पैकी ८९ मते मिळाली. विशेष म्हणजे या गटातील पाच मते बाद झाली. याशिवाय विद्यापीठ शिक्षक गटामध्येही आघाडीचे वर्चस्व राहीले. या गटात आघाडीच्या सागर डेळेकर –९५ मते, डॉ. भारती पाटील – ९७ मते तर विकास मंचच्या एन. बी. गायकवाड यांनी १०० मतांसह विजय मिळविला. नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघातील निकालात विकास आघाडी रात्री उशिरापर्यंत आघाडीवर होती. यात अनुचित जाती प्रवर्गातून स्वाती पंडित– ५ हजार २२५ मतांनी तर ओबीसी प्रवर्गातून दिनेश जगंम ४ हजार ८७९ मतांनी विजयी झाले.

### विद्यार्थी हाच केंद्र बिंदू : डॉ. संजय पाटील

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विकास आघाडी नेहमीच कार्यरत असते. आघाडीने पालकमंत्री चंद्रकांत पाटील, रयत शिक्षण संस्थेचे अनिल पाटील, विवेकानंद शिक्षण संस्थेचे अभयकुमार साळुंखे यांच्या सहकार्याने सोबत आलेल्या सर्व घटकांना योग्य जागा वाटप केली. त्यामुळे विद्यापीठ निवडणूकीत विकास आघाडीला घवघवीत यश मिळाले. भविष्यात बदलत्या शिक्षण पध्दतीप्रमाणे शिक्षणात तंत्रज्ञान आणून शिवाजी विद्यापीठ आंतरराष्ट्रीय पातळीवर घेवून जाण्याचा मानस आहे, अशी प्रतिक्रिया विद्यापीठ विकास आघाडी अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांनी दिली.

### विद्यापीठाच्या ढिसाळ नियोजनामुळे मतमोजणीला वेळ

विद्यापीठ निवडणूकीच्या मतमोजणी प्रक्रियेमध्ये विद्यापीठाने फारच कमी कर्मचाऱ्यांची नेमणूक केली होती. त्यामुळे निकाल वेळेत लागला नाही. तसेच विद्यापीठात वेगवेगळया विभागाच्या इमारती उपलब्ध असूनही एकाच इमारतीच्या रूममध्ये कमी मनुष्यबळावर विद्यापीठ निकालाचे काम सुरू होते. त्यामुळे निकाल वेळेवर लावण्याच्या बाबतीत विद्यापीठाचे नियोजन ढिसाळ असल्याचा आरोप विकास आघाडीच्या नेत्यांनी करत नाराजी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2017
तरुण भारत

# विद्यापीठ अभ्यास मंडळावर विकास आघाडीची बाजी

पान १ वरुन

बहूतेक गटांची मतमोजणी दुपार नंतर होणार असल्याने कॉलेज मधील आपले नियमीत काम संपवून अनेक प्राध्यापक मतमोजणी ठिकाणी दाखल झाले होते. तर विद्यापीठ वर्तूळात गेल्या महिन्याभरामध्ये झालेल्या घडामोडी आणि त्याचा निकालावर होणारा परीणाम यांची चर्चा दिवसभर रंगली होती.

**मतमोजणी केंद्राला कुलगुरुंची भेट**

दरम्यान सकाळी दहा वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मतमोजणी केंद्रास भेट दिली. यावेळी त्यांनी मतमोजणी प्रक्रियेची माहिती घेतली. मतमोजणीत सहभागी कर्मचारी व अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

**विद्यापीठाला छावणीचे स्वरूप**

विद्यापीठ प्रशासनाने मतमोजणीच्या ठिकाणी गोंधळ होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवला होता. दिवसभर विद्यापीठाला छावणीचे स्वरूप आले असले तरी शिस्तबद्ध पध्दतीने आणि शांततेत प्राध्यापक आपला निकाल पाहण्यासाठी प्रयत्न करत होते.

2 1 NOV 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अभ्यास मंडळांवर विकास आघाडीचे वर्चस्व

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीत १५ अभ्यास मंडळांवर शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) २१ उमेदवार विजयी झाले. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्या उमेदवारांनी २० जागांवर बाजी मारली; तर ४ अपक्ष उमेदवार विजयी झाले. १५ पैकी ७ मंडळांवर विकास आघाडी, तर ६ मंडळांवर



'सुटा'चे वर्चस्व राहिले आहे. एका गटात अपक्ष व अन्य एका गटात समसमान उमेदवार निवडून आले. यापूर्वी ११ अभ्यास मंडळे बिनविरोध झाली आहेत. त्यांतील १० जागांवर विकास आघाडीचे वर्चस्व आहे. विकास आघाडीचे एकूण १७ व 'सुटा'चे ६ अभ्यास मंडळांवर वर्चस्व आहे. विद्यापीठातील परीक्षा भवनात आज मतमोजणी झाली.

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व शिवाजी विद्यापीठ विकास मंच, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे सदस्य सकाळी साडेआठलाच पान ९ वर »

21 NOV 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अभ्यास मंडळांवर विकास आघाडीचे वर्चस्व

» पान १ वरून

परीक्षा भवन एकच्या परिसरात हजर होते. निकालाची हुरहूर त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. सकाळी नऊला मतमोजणीस प्रारंभ झाल्यानंतर प्रथम विद्यापीठ शिक्षक गटाचा निकाल जाहीर झाला. या गटात शिवाजी विद्यापीठ विकास मंच व शिवाजी विद्यापीठ पीजी टीचर्स असोसिएशनचे (सुप्टा) सचिव प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड तब्बल १०० मते मिळवून विजयी झाले. खुल्या प्रवर्गातून शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्या प्रा. डॉ. भारती पाटील ९७, तर याच आघाडीचे प्रा. सागर डेळेकर ९५ मते मिळवून विजयी झाले. प्राचार्य गटाच्या दहापैकी नऊ जागा बिनविरोध झाल्या होत्या. एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे डॉ. सी. टी. कारंडे ८९ मते मिळवून विजयी झाले. निवडणुकीत प्राचार्यांची पाच मते बाद झाली.

**बिनविरोध झालेली अभ्यास मंडळे**

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी - राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अकाउंटन्सी, स्टॅट, शिक्षणशास्त्र, फार्मसी, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, इक्लेट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, सायकॉलॉजी.

**ते दोघे पराभूत**

भूगोल अभ्यास मंडळासाठी 'सुटा'चे अरुण ए. पाटील व शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे अरुण बी. पाटील यांनी उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, दोघेही पराभूत झाले.

**चिठ्ठीवर हासबे विजयी**

गणित मंडळासाठी शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे दिलीप रायाप्पा हासबे व 'सुटा'चे जनार्दन ज्ञानदेव यादव यांना समान पाच मते पडली. चिठ्ठीवर दिलीप हासबे विजयी.

**तीनही जागा 'सुटा'कडे**

इतिहास मंडळाच्या तिन्ही जागांवर 'सुटा'चे उमेदवार विजयी झाले. एन. ए. वरेकर, एम. ए. चव्हाण, राजश्री निकम यांचा समावेश आहे.

**विकास मंचाला स्थान**

पाच संघटनांच्या एकत्रीकरणातून आकारास आलेल्या विकास मंचचे सदस्य व पीजी टीचर्स असोसिएशनचे डॉ. एन. बी. गायकवाड तब्बल शंभर मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विजयाने विकास मंचने विद्यापीठ शिक्षक गटात स्थान मिळवले.

**'सुटा'चे सहकार्यवाह पराभूत..**

'सुटा'चे सहकार्यवाह डॉ. आर. जी. कोरबू बिझनेस इकॉनॉमी अभ्यास मंडळाचे उमेदवार होते. त्यांना केवळ दोनच मते मिळाल्याने ते पराभूत झाले.



कोल्हापूर : पदवीधर गटात विजयी झालेले शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार स्वाती पंडित, अमरसिंह रजपूत, दिनेश जंगम समर्थकांसमवेत.

**फेरमतमोजणीत सोनाप्पांची बाजी...**

कॉमर्स अभ्यास मंडळावर तुळशीराम महानवर हे विजयी झाले. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार सोनाप्पा दाजीबा गोरल यांनी फेरमतमोजणीची मागणी केली. त्यात सोनाप्पा यांनी दहा मते मिळवून बाजी मारली.

**भारती पाटील विजयी**

विद्यापीठ शिक्षक गटाच्या खुल्या प्रवर्गातून प्रा. डॉ. भारती पाटील विजयी झाल्या. त्यांच्या विजयाचा आनंद गुलाल उधळून साजरा करण्यात आला.

## पदवीधरमध्ये विकास आघाडीला तीन जागा

**अधिकार मंडळाच्या पदवीधर मंडळातील तीन जागांवर विकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले. स्वाती विनोद पंडित, अमरसिंह रजपूत व दिनेश जंगम यांनी आपापल्या गटात बाजी मारली. रात्री बाराच्या सुमारास हा निकाल जाहीर झाला. उर्वरित सहा जागांसह विद्यापरिषद व महाविद्यालयीन शिक्षक गटाची मतमोजणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. पदवीधरमधून स्वाती पंडित यांनी ५२२५ मते मिळविली. प्रतिस्पर्धी विश्वास माने यांना ९१५ मते मिळाली. अमरसिंह रजपूत यांना ५०६३ तर चंद्रशेखर पोरे यांना ८७१ मते मिळाली. दिनेश जंगम यांना ४८७९ मते मिळाली. विजयानंतर आघाडीच्या समर्थकांनी जल्लोष केला.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2017
पुढारी

# विद्यापीठ शिक्षक, अभ्यास मंडळांवर विकास आघाडीचा वरचष्मा

## ■ पदवीधर गटात विजयाकडे वाटचाल ■

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा व विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीत विद्यापीठ शिक्षक, विविध अभ्यास मंडळे आणि प्राचार्य या सोमवारी जाहीर झालेल्या निकालात शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने निर्विवाद यश संपादन केले.

पदवीधर गटात विकास आघाडीची विजयाकडे वाटचाल सुरू आहे. तीन उमेदवार मोठ्या फरकाने विजयी झाले आहेत. विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे, कंसात त्यांना पडलेली मते : स्वाती विनोद पंडित (५,२२५), दिनेश गंगाधर जंगम (४,८७९), अमरसिंह चंदरसिंग रजपूत (५,०६३). विजयी उमेदवारांची नावे जाहीर होताच विजयी उमेदवारांसह समर्थकांनी मध्यरात्री जल्लोष केला. आघाडीच्या इतर सहा उमेदवारांची विजयाच्या दिशेने आगेकूच सुरू आहे.

**(सविस्तर वृत्त माय कोल्हापूरमध्ये)**

21 NOV 2017
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभ्यास मंडळांवर विकास आघाडीचे वर्चस्व

## 'सुटा'ला दणका; सतरा अभ्यास मंडळे आघाडीकडे, सहा अभ्यास मंडळे 'सुटा'कडे

### 'सुटा'च्या सहकार्यवाहांना कमी मते

*शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) कोल्हापूर सहकार्यवाह डॉ. आर.जी. कोरबू यांना अभ्यास मंडळाच्या व्यावसायिक अर्थशास्त्र गटात ३२ पैकी २ मते पडली आहे. निवडणुकीपूर्वी सुटाचे बंडखोर उमेदवार प्रा. रघुनाथ ढमकले विरुद्ध सुटा असा सामना रंगला होता. याचाच फटका प्रा. कोरबू यांना बसला असल्याची प्राध्यापक वर्तुळात चर्चा होती.*

### पदवीधर पेटीत प्राध्यापकांची २१० मते

*प्राध्यापकांच्या गटातील सुमारे २१० मते नोंदणीकृत पदवीधर गटाच्या मतपेटीत आढळून आली.*

### एका मतासाठी अर्धा तास

*अभ्यास मंडळ गटात मतांच्या एकूण बेरजेत एक मत कमी पडत होते. हे मत शोधण्यासाठी इतर सर्व पेट्यांतील मते पाहण्यात आली. यासाठी सुमारे अर्धा तास लागला.*

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी सोमवारी (दि. २०) सकाळी आठ वाजता मतमोजणीस सुरुवात झाली. दुपारपर्यंत झालेल्या मतमोजणीत विद्यापीठ शिक्षक आणि अभ्यास मंडळावर शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या (सुटा) वर्चस्वाला दणका बसला. या गटामध्ये शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने वर्चस्व प्रस्थापित केले. विद्यापीठ शिक्षक विभागासाठी १८४ मतदान झाले. यामध्ये विकास आघाडी आणि विकास मंच यांच्यात मैत्रीपूर्ण लढत होती. आतापर्यंत २५पैकी १७ अभ्यास मंडळांवर आघाडीने निर्विवाद वर्चस्व राखले आहे. सुटाला सहा अभ्यास मंडळांवर समाधान मानावे लागले आहे.

**विद्यापीठ शिक्षक :** खुल्या प्रवर्गातून प्रा. डॉ. सागर डेळेकर (९५ मते), प्रा. डॉ. भारती पाटील ९७ हे आघाडीचे विजयी झाले तर विकास मंचचे एन. बी. गायकवाड (१०० मते) हे मागासवर्गीय प्रवर्गातून विजयी ठरले. कॉमर्स गटात फेरमतमोजणीत सोनाप्पा गोरल विजयी ठरले.

**विविध अभ्यास मंडळांचे निकाल व कंसात मते व गट - गणितशास्त्र :** दिलीप रायाप्पा हसबे (३, विकास आघाडी), नवनीत धोंडिबा सांगले (५, विकास आघाडी), हंबीर तात्यासाहेब दिंडे (५, सुटा). हसबे व जनार्दन यादव यांना समान मते पडली. त्यामुळे चिठ्ठीद्वारे हसबे विजयी झाले.

**व्यवस्थापन :** दत्तात्रय तात्याबा चावरे (५, आघाडी), सारंग शंकर भोला (५, आघाडी), रवींद्र बसवंत तेली (७,



शिवाजी विद्यापीठ

सुटा) **मायक्रो बायोलॉजी :** एच. व्ही. देशमुख (३, आघाडी), ए. आर. जाधव (३, सुटा), एस. एस. सुपनेकर (३, सुटा) **व्यावसायिक अर्थशास्त्र :** यू. एम. माळकर (१४), बी. के. माने (९, दोघेही सुटा), व्ही. एम. कुंभार (७, आघाडी). **वनस्पतीशास्त्र :** व्ही. सी. कारंडे (९), एम. बी. वाघमारे (९, दोघेही आघाडी), ए. एन. सादळे (७, सुटा). **फिजिक्स :** व्ही. व्ही. किल्लेदार (११), एम. एम. करंजकर (९, दोघेही आघाडी), यू. के. मोहिते (८, सुटा). **हिंदी :** सुनील बापू बनसोडे (२०, अपक्ष), संजय पिराजी चिंदगे (२०, सुटा), एकनाथ सुकोजी पाटील (१९, आघाडी). **प्राणीशास्त्र :** विश्वनाथ यशवंत देशपांडे (६), सुरेश आनंदराव खाबडे (९, दोघेही आघाडी), सत्यवान सुबराव पाटील (६, सुटा), पाटील व एस. ए. मांजरे यांना समान मते पडल्याने चिठ्ठीद्वारे पाटील विजयी. **मराठी :** अरुण शिंदे (२४), उदय जाधव (१९, दोघेही सुटा), दत्ता पाटील (२२, अपक्ष) **कॉमर्स :** सोन्नाप्पा दाजीबा गोरल (आघाडी), शिवाजी रामचंद्र पोवार व उदयकुमार रामचंद्र शिंदे (दोघेही सुटा) **भूगोल-भूगर्भशास्त्र :** श्रीकृष्ण गायकवाड (अपक्ष), बाळासाहेब जाधव (१३, आघाडी), **पान ४ वर»**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2017
पुढारी

# अभ्यास मंडळांवर विकास आघाडीचे वर्चस्व

**(पान १ वरून)** विनोद रामचंद्र वीर (१३, अपक्ष).

**केमिस्ट्री–**केमिकल इंजिनिअरिंग : सी. पी. माने (११), संजय पोरे (१४ दोघेही आघाडी), रंजत कांबळे (१३, सुटा) **इंग्रजी :** संभाजी बाबूराव भांबर (२८), नामदेव पांडुरंग खवरे (२५, दोघेही आघाडी), राजेंद्र सत्यशील पोंदे (२०, सुटा) **इतिहास :** सुरेश मारुती चव्हाण (३५), राजश्री दिलीप निकम (१८, दोघेही सुटा), निवासराव आदिकराव वरेकर (सुटा ३५) **अर्थशास्त्र :** एस. एम. भोसले (२५, आघाडी), विजय देसाई (२५), विजयकुमार पाटील (२२, दोघेही सुटा).

**दहा बिनविरोध अभ्यासमंडळे विकास आघाडीकडे**

१) संख्याशास्त्र, २) इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग, ३)सिव्हिल इंजिनिअरिंग, ४)मेकॅनिकल इंजिनिअरिंग, ५)इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग ६) फार्मसी ७) अकौंटन्सी ८) राज्यशास्त्र ९) समाजशास्त्र १०) शिक्षणशास्त्र आदी बिनविरोध शाखा विकास आघाडीकडे आहेत. निवडणुकीत वर्चस्व प्राप्त झालेली मंडळे निवडणुकीत आघाडीचे वर्चस्व असलेली मंडळे गणितशास्त्र, व्यवस्थापन, वनस्पतीशास्त्र, फिजिक्स, प्राणिशास्त्र, केमिस्ट्री, इंग्रजी आदी.

**'सुटा'चे वर्चस्व असलेली अभ्यासमंडळे**

अर्थशास्त्र, इतिहास, कॉमर्स, मराठी, व्यावसायिक अर्थशास्त्र, मायक्रो बायोलॉजी,

**प्राचार्य गटांत सी. टी. कारंडे विजयी**

प्राचार्य गटातील आठ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या. एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत सी. टी. कारंडे (८९ मते) हे विजयी झाले. प्राचार्य गटांत सर्वच म्हणजे नऊ जागांवर आघाडीचे वर्चस्व राहिले.

भूगोल अभ्यास मंडळावर अपक्षांचे वर्चस्व तर हिंदी अभ्यास मंडळात सुटा व आघाडीने एक जागा मिळवली आहे. संस्थाचालक प्रतिनिधींसाठीच्या सहाही जागा विकास बिनविरोध झाल्या असून यावर विकास आघाडीचे वर्चस्व आहे. प्राचार्य गटातील आठ जागा यापूर्वी बिनविरोध असून निवडणूक लागलेल्या एक जागाही आघाडीच्या ताब्यात.

21 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मतपत्रिका मिसळल्याने मतमोजणी रेंगाळली

## उमेदवार वेटिंगवर; विद्यापीठ निवडणूक



कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजीविद्यापीठनिवडणुकीत पदवीधर गटाच्या मतपत्रिका शिक्षक गटाच्या मतपेटीत तर शिक्षक गटाच्या मतपत्रिका पदवीधर गटाच्या मतपेटीत बहुतेक मतदारांनी टाकल्याने वर्गीकरण करण्यासाठी तब्बल सहा तास लागले. त्यामुळे पदवीधर, महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्या परिषदेची मतमोजणी रात्री नऊनंतर सुरू करण्यात आली. सकाळी आठपासून निकालाची वाट पहाणारे उमेदवार यामुळे कंटाळले. रात्री उशिरापर्यंत त्यांनी केंद्रात तळ ठोकला.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा कार्यक्षेत्रातील ३३ केंद्रांवर शुक्रवारी मतदान झाले. अनेक मतदारांनी मतदान केल्यानंतर दुसऱ्याच मतपेटीत मतपत्रिका टाकल्याचे मोजणीवेळी दिसून आले. मतमोजणी रेंगाळल्याने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे स्वत: मतमोजणी केंद्रात रात्री उशिरापर्यंत सातत्याने येऊन सूचना करत होते.

### मतपत्रिका बाद होण्याचे मोठे प्रमाण

अभ्यासमंडळे, विद्यापीठ शिक्षक, प्राचार्य आदी गटांत मतपत्रिका बाद होण्याचे प्रमाण लक्षणीय दिसून आले. विद्यापीठ शिक्षक गटांत तर एक मतपत्रिका कोरी असल्याचे दिसून आले.

### अभ्यास मंडळांवर निर्विवाद वर्चस्व

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीमध्ये प्राचार्य, स्वामी विवेकानंद, रयत शिक्षण संस्थेसह विकास मंच, सेवक संघ असे सर्व घटक समाविष्ट आहेत. सर्वांनी मिळून संघटित परिश्रम घेतल्याने निकाल जाहीर झालेल्या प्राचार्य, विद्यापीठ शिक्षक गटांत आम्ही शंभर टक्के यश मिळवले. १९ अभ्यास मंडळांवर आघाडीचे वर्चस्व आहे. गतनिवडणुकीत दोन अभ्यास मंडळे आमच्याकडे होती; पण सर्वांच्या प्रयत्नांमुळे अभ्यास मंडळांवर आमचे निर्विवाद वर्चस्व आम्ही प्रस्थापित करू शकलो. विकास आघाडी एक वर्षात विद्यापीठासाठी ग्लोबल दर्जाचे उपक्रम राबवणार आहे.

– डॉ. संजय डी. पाटील (अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी)

### निवडणुकीत चांगले यश : सुटाचा दावा

अभ्यास मंडळाच्या निवडणुकीत सुटा पुरस्कृत उमेदवारांना चांगले यश मिळाले असल्याचा दावा शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने पत्रकाद्वारे केला आहे. सहा अभ्यास मंडळांमध्ये सुटाला मताधिक्य मिळाले आहे. तर इतर अभ्यास मंडळांमध्ये सुटा पुरस्कृत उमेदवारांना पन्नास टक्के यश मिळाले आहे. समाजशास्त्र, संख्याशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र या तीन अभ्यास मंडळाच्या बिनविरोध निवडणुकीत सुटाला मताधिक्य आहे. त्यामुळे अठरा मंडळांपैकी ९ अभ्यास मंडळांमध्ये मताधिक्य मिळाले असल्याचाही दावा करण्यात आला आहे.

21 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिंकलो...उमेदवारांचा विजयी जल्लोष

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सकाळी सव्वानऊच्या सुमारास शिवाजी विद्यापीठ शिक्षक गटांतील पहिला निकाल जाहीर झाला. यामध्ये विजयी ठरलेले प्रा. सागर डेळेकर हे धावतच विजयाची बातमी सहकाऱ्यांना देत परिसरात आले. यानंतर अभ्यास मंडळांचे निकाल दर पंधरा मिनिटांनी जाहीर होऊ लागले.

जसजसे निकाल जाहीर होत होते. तसतसे विजयी उमेदवार जिंकलो म्हणत सहकाऱ्यांना अलिंगन देत जल्लोष करीत होते. विजयी उमेदवार गुलालात न्हाऊन निघत होते. सकाळी आठ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा भवन क्रमांक-२ च्या इमारतीत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या उपस्थितीत मतमोजणीस सुरुवात झाली. विद्यापीठ शिक्षक गट आणि अभ्यास मंडळाच्या मतांचे वर्गीकरण करण्यात आले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांसह समर्थकांनी एकच जल्लोष केला.**

या दोन्ही विभागांत मतांची संख्या कमी असल्याने पहिला निकाल सव्वानऊ वाजता बाहेर पडला. हा निकाल विकास आघाडीच्या बाजूने असल्याने साहजिकच विकास आघाडीच्या समर्थकांचे चेहरे आनंदले.

अभ्यास मंडळांतील जागा 'सुटा' एकतर्फी जिंकेल, असे वाटत होते; मात्र या 'सुटा'च्या हक्काच्या विभागांत आघाडीने सुरुवातीपासून जोरदार मुसंडी मारल्याने 'सुटा'च्या उपस्थित पदाधिकाऱ्यांत खळबळ माजली.

एकूण पंधरा अभ्यास मंडळांचे निकाल दुपारी तीनपर्यंत जाहीर झाले. पराभूत उमेदवार निराश होऊन केंद्राबाहेर जात होते. आघाडीचे समर्थक आणि 'सुटा'चे पदाधिकारी मतमोजणीचा निकाल आपापल्या नेत्यांना मोबाईलवरून कळवत होते.

विकास आघाडीत विकास मंच, रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, अभाविप, सुप्टा, सेवक संघ, प्राचार्य संघटना, संस्था चालक आदी संघटना असल्याने या सर्वांचे समर्थक मतमोजणी केंद्र परिसरात ठिय्या मांडून बसले होते. दुपारी तीननंतर नोंदणीकृत पदवीधर आणि महाविद्यालय शिक्षक विभागाचे वर्गीकरण (सॉर्टिंग) सुरू झाले. पदवीधर गटात साडेसहा हजार मतदान झाले आहे.

दरम्यान, मतमोजणी केंद्रास सकाळी दहाच्या सुमारास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भेट देऊन काही सूचना दिल्या.

21 NOV 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ निवडणूक मतमोजणीनंतर विजयी उमेदवार व त्यांचे समर्थक जल्लोष करताना. (छाया : तय्यब अली)

21 NOV 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बोर्ड ऑफ स्टडीजवर विकास आघाडीचा वरचष्मा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या पंचवीस बोर्ड ऑफ स्टडीज अर्थात अभ्यास मंडळावर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने आपला वरचष्मा राखला. सोमवारी झालेल्या १५ अभ्यास मंडळाच्या मतमोजणीमध्ये सुटाचे उमेदवार अधिक उमेदवार विजयी झाले असले तरी, यापूर्वी झालेल्या १० बिनविरोध अभ्यास मंडळामुळे एकूण अभ्यास मंडळांवर विकास आघाडीचेच वर्चस्व निर्माण झाले आहे. तर प्राचार्य गटाच्या एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत ही सी. टी. कारंडे हे विजयी झाले. तर विद्यापीठ शिक्षकमध्येही आघाडीनें वर्चस्व प्रस्थापित केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळांसाठी सोमवारी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाली. सायंकाळ पर्यंत निवडणूक लागलेल्या १५ मंडळाची निकाल हाती लागले. यामध्ये उमेदवारांच्या संख्येमध्ये सुटा अल्पशा फरकाने पुढे होती. मात्र एकूण अभ्यास मंडळावर विकास आघाडीने सुटाची मक्तेदारी मोडून काढत आपले वर्चस्व प्रस्तापित केले. एकूण ४५ अभ्यास मंडळासाठी ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येणार होती. मात्र १२ अभ्यास मंडळांसाठी एकही मतदार नसल्याने तर ७ मंडळांसाठी एकही उमेदवारी अर्ज न आल्याने उर्वरित मंडळासाठी निवडणूक लागली. त्यापैकी ११ अभ्यास मंडळे बिनविरोध झाली. त्यापैकी १० अभ्यास मंडळावर विकास आघाडीचे निर्विवाद वर्चस्व होते. तर सोमवारी उर्वरीत १५ अभ्यास मंडळासाठी मतमोजणी पार पडली. सोमवारी झालेल्या मतमोजणीमध्ये ७ अभ्यास मंडळे विकास आघाडीकडे, ६ सुटाकडे तर १ अपक्ष आणि १ समान राहिले. गत निवडणुकीत विकास आघाडीकडे केवळ २ अभ्यास मंडळे होती त्यामध्ये यंदा १५ ने वाढ झाली ही संख्या आता १७ वर पोहचली आहे, तर सुटाची मात्र मोठी पिछेहाट झाली आहे. बिनविरोध झालेल्या अभ्यास मंडळाचा विकास आघाडीला मोठा फायदा झाला आहे.

प्राचार्य गटामधील यापूर्वीच ८ जागा बिनविरोध झाल्या आहेत. फक्त एका जागेसाठी मतदान झाले होते. त्या जागेवर विकास आघाडीच्या सी. टी. कारंडे यांनी विजय मिळविला. त्यांना ११५ पैकी ८९ मते मिळाली. विशेष म्हणजे या गटातील पाच मते बाद झाली. तर विद्यापीठ शिक्षक गटाच्या सोमवारी मतमोजणी झालेल्या जागेवर या आघाडीचे वर्चस्व राहिले. या गटात आघाडीच्या सागर डेळेकर - ९५ मते, डॉ. भारती पाटील - ९७ मते तर विकास मंचच्या एन. बी. गायकवाड यांनी १०० मतांनी विजय मिळविला.



### विकास आघाडीकडून बिनविरोध आलेली अभ्यास मंडळे

संख्याशास्त्र, इलेक्ट्रानिक्स सायन्स ॲन्ड इलेक्ट्रानिक्स इंजिनिअरींग, सिव्हील इंजिनिअरींग, मेकॅनिकल इंजिनिअरींग, इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग, फार्मसी, अकौंटन्सी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र.

### विद्यार्थी हाच केंद्रबिंदू

विकास आघाडीचे धोरण हे नेहमीच विद्यार्थी केंद्रीत राहणार आहे. आघाडी सोबत आलेल्या सर्व घटकांना योग्य जागा वाटप आणि त्या सर्वांचे सहकार्य आणि मार्गदर्शनामुळे अभ्यास मंडळे आघाडीकडे आली आहेत. जवळपास सर्वच अभ्यासमंडळांवर आघाडीचे उमेदवार निवडून गेले आहेत.

**- संजय डी. पाटील,** निमंत्रक विकास आघाडी

### विकास आघाडीच्या नेत्यांची उपस्थिती

मतमोजणी केंद्रवर दिवसभर फारशी गर्दी नव्हती. मात्र सायंकाळ नंतर निकालाचे चित्र स्पष्ट होऊ लागले. त्यामध्ये विकास आघाडी पुढे होती. त्यामुळे रात्री आठ नंतर प्रताप माने, डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह आघाडीच्या नेत्यांनी मतमोजणीच्या ठिकाणी भेट दिली. सर्वच जागांवर आपले उमेदवार निवडून येणार असल्याचा दावा केला. तर आघाडीचे निमंत्रक संजय डी. पाटील यांनी रात्री ११ च्या सुमारास भेट दिली.

2 1 NOV 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास मंडळावर सत्ता : चिठ्ठीद्वारे दोन उमेदवार विजयी; समर्थकांची गुलालाची उधळण

# 'विकास आघाडी'ची जोरदार मुसंडी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा)चे वर्चस्व असणाऱ्या अभ्यास मंडळे (बीओएस) गटात या निवडणुकीमध्ये विद्यापीठ विकास आघाडीने जोरदार मुसंडी मारली आहे. आघाडीने १७ 'बीओएस'वर सत्ता काबीज केली आहे.

'सुटा कोल्हापूर'चे सहकार्यवाह आर. जी. कोरबू यांचा 'बीओएस'च्या व्यावसायिक अर्थशास्त्र गटात पराभव झाला. त्यांना दोन मते मिळाली. कॉमर्स गटात सोनाप्पा गोरल यांनी फेरमतमोजणीची मागणी केली. त्यात ते विजयी झाले. गणित विषय गटात 'सुटा'चे जनार्दन यादव आणि विकास आघाडीचे दिलीप हसबे यांना समान तीन, तर प्राणीशास्त्र गटात एस. ए. मांजरे आणि सत्यवान पाटील यांना समान सहा मते मिळाली. त्यात चिठ्ठीद्वारे दिलीप हसबे आणि सत्यवान पाटील विजयी ठरले.



नसीर अत्तार

कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीतील विद्यापीठ शिक्षक गटात विकास आघाडीच्या प्रा. भारती पाटील यांनी बाजी मारली. त्यांच्या विजयानंतर विद्यार्थ्यांनी गुलालाची उधळण केली.

विषयनिहाय विजयी उमेदवार (कंसात मते, संघटना) : गणित - दिलीप हसबे (३), नवनीत सांगले (५ आघाडी), हंबीरराव दिंडे (५ सुटा). व्यवस्थापन - दत्तात्रय चवरे, शंकर सारंग (५, आघाडी), रवींद्र तेली (७ सुटा). मायक्रो बायोलॉजी - एच. व्ही. देशमुख (३ आघाडी), ए. आर. जाधव, एस. एस. सुपणेकर (३ सुटा). भौतिकशास्त्र - एम. एम. कारंजकर (९), व्ही. व्ही. किल्लेदार (११), किसन मोहिते (८ सुटा). वनस्पतीशास्त्र - वनिता कारंडे, महेंद्र वाघमारे (९ आघाडी), अशोक सादळे (७ सुटा). व्यावसायिक अर्थशास्त्र - विजय कुंभार (७), उदय माळकर (१४ आघाडी), बाळासाहेब माने (९ सुटा). मराठी - अरुण शिंदे (२४), उदय जाधव (१९ सुटा), दत्तात्रय पाटील (२२ अपक्ष). हिंदी - एस. बी. बनसोडे (२० अपक्ष), संजय चिंदगे (२० सुटा), एकनाथ पाटील (१९ आघाडी ). प्राणीशास्त्र - विश्वनाथ देशपांडे (६), सुरेश खाबडे (९ आघाडी), सत्यवान पाटील (६ सुटा). रसायनशास्त्र, केमिकल इंजिनिअरिंग - सी. पी. माने (११), संजय पोरे (१४ आघाडी), रंजन कांबळे (१३ सुटा). वाणिज्य - सोनाप्पा गोरल (१० आघाडी), शिवाजी पोवार (१३), उदयकुमार शिंदे (१४ सुटा). भूगर्भशास्त्र - भूगोल- श्रीकृष्ण गायकवाड (१२), विनोद वीर (१३, अपक्ष), बाळासाहेब जाधव (१३, आघाडी). इंग्रजी- एस. बी. भांबर (२८), एन. पी. खवरे (२५ आघाडी), आर. एस. पोंडे (२० सुटा). इतिहास - एन. ए. वरेकर (३५), एस. एम. चव्हाण (२३), आर. डी. निकम (१८ सुटा). अर्थशास्त्र - एस. एम. भोसले (२५, आघाडी), व्ही. बी. देसाई (२५), व्ही. ए. पाटील (२२, सुटा).

## अन्य गटांत 'आघाडी' भारी

निवडणुकीच्या सुरुवातीलाच संस्थाचालक गटातील सहा जागा आणि प्राचार्य गटातील आठ जागा बिनविरोध झाल्या. त्यावर विकास आघाडीचे वर्चस्व राहिले. प्राचार्य गटातील एका जागेसाठी निवडणूक लागली. त्यामध्ये आघाडीचे उमेदवार विजयी झाले. ३३ बीओएससाठी निवडणूक लागली. त्यातील सात स्वीकृत, तर ११ बिनविरोध झाल्या. त्यातील १० आघाडीकडे आहेत. उर्वरित १५ 'बीओएस'साठी मतदान झाले त्यातील ७ आघाडीकडे व ६ 'सुटा' कडे राहिल्या.



स्वाती पंडित



दिनेश जंगम

## पदवीधरमध्ये 'आघाडी'च



अमरसिंह रजपूत

नोंदणीकृत पदवीधर गटात विकास आघाडीचीच विजयाकडे वाटचाल सुरु असून आघाडीचे स्वाती विनोद पंडित(मते ५२२५), दिनेश गंगाधर जंगम (मते ४८७९) व अमरसिंह चंदरसिंग रजपूत (मते ५०६३) हे विजय झाले. इतर सहा ठिकाणी आघाडीचे उमेदवार विजयाच्या मार्गावर आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 1 NOV 2017
लोकमत

# अभ्यास मंडळांवर विकास आघाडीचे वर्चस्व

## 'सुटा'ची पीछेहाट; शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणूक; पदवीधर गटातही आघाडीच

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यार्थी केंद्रीत कामकाजाची ग्वाही देत शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या विद्यापीठ विकास आघाडीने सोमवारी अभ्यास मंडळ (बीओएस), प्राचार्य आणि विद्यापीठ शिक्षक गटांत वर्चस्व मिळविले. या गटांमध्ये विद्यापीठ शिक्षक संघाची (सुटा) पीछेहाट झाली. अन्य गटांतील मतमोजणी रात्री उशिरापर्यंत सुरु होती.

या निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडी आणि विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्यात लढत झाली. विद्यापीठ विकास मंच, अभाविप, प्राचार्य, संस्थाचालक असोसिएशन, सुप्टा, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संघटनांची मोट विकास आघाडीने बांधली. 'सुटा'समवेत विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती राहिली. काही अपक्षदेखील निवडणुकीच्या रिंगणात उतरले. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभा, अभ्यास मंडळे, प्राचार्य, संस्थाचालक, नोंदणीकृत पदवीधर, महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक आणि विद्यापरिषद (शिक्षक) गटातील एकूण १८८ जागांसाठी (पान ४ वर)

> रयत, विवेकानंद शिक्षण संस्था, अभाविप, विद्यापीठ विकास मंच, सुप्टा, संस्थाचालक, प्राचार्य असोसिएशन आदींच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आघाडीला यश मिळाले. यावेळी १९ अभ्यास मंडळांवर बाजी मारली आहे. शिवाजी विद्यापीठ हे देशातील अव्वल विद्यापीठ बनविण्यासाठी प्रयत्न राहील.
>
> \- संजय डी. पाटील, प्रमुख, विद्यापीठ विकास आघाडी

> सुटा पुरस्कृत उमेदवारांना अभ्यास मंडळांच्या निवडणुकीत घवघवीत यश मिळाले आहे. १८ अभ्यास मंडळांपैकी ९ मंडळांवर 'सुटा'ला मताधिक्य मिळाले आहे. अधिसभा, विद्वत सभेमध्ये देखील 'सुटा'चे उमेदवार निश्चितपणे निवडून येतील.
>
> \- प्रा. सुधाकर मानकर, निवडणूक समन्वयक, सुटा.

# विकास आघाडीचे वर्चस्व

(पान १ वरून) निवडणूक झाली. त्यातील ११ अभ्यास मंडळे (बीओएस) आणि संस्था प्रतिनिधी सहा, नोंदणीकृत पदवीधर एक, शिक्षक (अधिसभा) एक आणि प्राचार्य गटातील आठ जागा बिनविरोध झाल्या आहेत. या सर्व गटांतील उर्वरित एकूण ७२ जागांसाठी १५६ उमेदवारांमध्ये लढत रंगली. त्यासाठी शुक्रवारी चुरशीने सरासरी ६२ टक्के मतदान झाले. विद्यापीठातील परीक्षा भवन क्रमांक दोनमध्ये सोमवारी सकाळी नऊ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. त्यात पहिला निकाल सकाळी अकरा वाजता विद्यापीठ शिक्षक गटाचा निकाल जाहीर झाला. या गटामध्ये विद्यापीठ विकास आघाडीच्या भारती पाटील (९७ मते), सागर डेळेकर (९५) आणि विकास मंचचे एन. बी. गायकवाड (१००) यांनी बाजी मारली. प्राचार्य गटात विकास आघाडीचे सी. टी. कारंडे हे ८९ मतांनी विजयी झाले. या गटानंतर विविध १५ विषयांच्या 'बीओएस' गटांतील मतमोजणी झाली. त्यात विकास आघाडीने 'सात', 'सुटा'ने सहा आणि अपक्षांनी एक, तर एका मंडळावर विकास आघाडी, सुटा व अपक्षांनी बाजी मारली. विजयी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी विजयाच्या घोषणा देत मतमोजणी केंद्रावर जल्लोष केला. दुपारी तीननंतर उर्वरित शिक्षक (अधिसभा), विद्यापरिषद शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर गटातील मतपत्रिकांचे वर्गीकरण, मतमोजणीचा प्रारंभ झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2017

सकाळ

# अभ्यास मंडळांचे निकाल असे

| विषय | मते | गट |
|---|---|---|
| **गणित** | | |
| हंबीरराव तात्यासाहेब शिंदे | ५ | सुटा |
| दिलीप रायाप्पा हासबे | ३ | विकास आघाडी |
| नवनीत धोंडिबा सांगळे | ५ | विकास आघाडी (चिठ्ठीवर विजयी) |
| **व्यवस्थापन** | | |
| दत्तात्रय तात्याबा चवरे | ५ | विकास आघाडी |
| शंकर भोला सारंग | ५ | विकास आघाडी |
| रवींद्र बसवंत तेली | ७ | सुटा |
| **भौतिकशास्त्र** | | |
| एम. एम. कारंजकर | ९ | विकास आघाडी |
| व्ही. व्ही. किल्लेदार | ११ | विकास आघाडी |
| उत्तम किसन मोहिते | ८ | सुटा |
| **वनस्पतिशास्त्र** | | |
| वनिता चंद्रशेखर कारंडे | ९ | विकास आघाडी |
| महेंद्र बसाप्पा वाघमारे | ९ | विकास आघाडी |
| अशोक नानासाहेब सादळे | ७ | सुटा |
| **बिझनेस इकॉनॉमिक्स** | | |
| विजय मारुती कुंभार | ७ | विकास आघाडी |
| उल्हास महादेव माळकर | १४ | सुटा |
| बाळासाहेब धोंडिबा माने | ९ | सुटा |
| **मराठी** | | |
| अरुण कृष्णा शिंदे | २४ | सुटा |
| उदय रामचंद्र जाधव | १९ | सुटा |
| दत्तात्रय मल्लू पाटील | २२ | अपक्ष |
| **मायक्रोबॉयोलॉजी** | | |
| हणमंत विठ्ठल देशमुख | ३ | विकास आघाडी |
| ए. आर. जाधव | ३ | सुटा |
| शिरीषकुमार सुपनेकर | ३ | सुटा |
| **कॉमर्स** | | |
| सोनाप्पा दाजीबा गोरल | १० | विकास आघाडी |
| शिवाजी रामचंद्र पोवार | १३ | सुटा |
| उदयकुमार रामचंद्र शिंदे | १४ | सुटा |
| **इंग्रजी** | | |
| एस. बी. भांबर | २८ | विकास आघाडी |
| एन. पी. खवरे | २५ | विकास आघाडी |
| आर. एस. पोंडे | २० | सुटा |
| **भूगोल** | | |
| श्रीकृष्ण गायकवाड | १२ | अपक्ष |
| बाळासाहेब जाधव | १३ | विकास आघाडी |
| विनोद वीर | १२ | अपक्ष |
| **इतिहास** | | |
| एन. वरेकर | ३५ | सुटा |
| एम. ए. चव्हाण | २३ | सुटा |
| राजश्री निकम | १८ | सुटा |
| **हिंदी** | | |
| एस. बी. बनसोडे | | अपक्ष |
| संजय चिंदगे | १९ | सुटा |
| एकनाथ पाटील | १९ | विकास आघाडी |
| **प्राणिशास्त्र** | | |
| विश्वनाथ यशवंत देशपांडे | ६ | विकास आघाडी |
| सुरेश खाबडे | ९ | विकास आघाडी |
| सत्यवान पाटील | ६ | सुटा |
| **अर्थशास्त्र** | | |
| व्ही. बी. देसाई | २५ | सुटा |
| विजयकुमार पाटील | २२ | सुटा |
| एस. एम. भोसले | २५ | विकास आघाडी |
| **रसायनशास्त्र** | | |
| आर. एम. कांबळे | १३ | सुटा |
| सी. पी. माने | १७ | विकास आघाडी |
| संजय पोरे | १४ | विकास आघाडी |

2 1 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिनेटवर विकास आघाडीचे वर्चस्व

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**


स्वाती पंडित


अमरसिंग रजपूत


दिनेश जंगम

**अंतर्गत कलहाचा 'सुटा'ला फटका**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा व विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीमध्ये अपेक्षेप्रमाणे शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने निर्विवाद वर्चस्व राखले. सिनेटच्या निवडणुकीत प्राचार्य, विद्यापीठ शिक्षक गटात विकास आघाडीच्या उमेदवारांनी विजय मिळवला. अभ्यास मंडळावरील 'सुटा'च्या आजवरचे वर्चस्व मोडीत काढत २५ पैकी सतरा अभ्यासमंडळे काबीज करत विकास आघाडीने वर्चस्व मिळवले. सुटाची केवळ सहा अभ्यासमंडळावर सत्ता आली आहे.

सोमवारी रात्री साडेबारापर्यंत जाहीर झालेल्या निकालानुसार सिनेटच्या पदवीधर गटातील दहापैकी चार जागांवर विकास आघाडीच्या दिनेश जंगम (ओबीसी), अंमरसिंग रजपूत (भटके-विमुक्त) आणि स्वाती पंडित (अ.जा.) व आरती शिंदे (महिला गट) या उमेदवारांनी विजय मिळवला.

प्राचार्य आणि संस्था प्रतिनिधी गटांतील मिळून १४ जागा यापूर्वीच बिनविरोध करत सिनेटवर वर्चस्व निर्माण केलेल्या विकास आघाडी नोंदणीकृत पदवीधर गटात एकहाती विजय मिळवण्याच्या मार्गावर आहे.



**पदवीधरमध्ये विकास आघाडी पुढे**

नोंदणीकृत पदवीधर गटामध्ये विद्यापीठ विकास आघाडी व विकास मंचच्या उमेदवारांनी आरक्षीत असलेल्या चार गटांत एकहाती विजय मिळवला. रात्री साडेबाराला हाती आलेल्या वृत्तानुसार खुल्या गटातील मल्लाप्पा चौगुले, श्रीनिवास गायकवाड, संजय जाधव, पंकज मेहता, प्रा. मधुकर पाटील हे उमेदवार आघाडीवर होते.

कॉलेज शिक्षक गटातील दहा जागा आणि अॅकेडमिक कौन्सिल गटात सुटा आणि विद्यापीठ विकास आघाडीत थेट लढत असून, शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा भवनमध्ये रात्री उशीरापर्यंत मतमोजणी सुरू होती.

सोमवारी सकाळी सुरू झालेल्या मतमोजणीत विद्यापीठ शिक्षक गटाचा पहिला निकाल अकरा वाजता जाहीर करण्यात आला. यामध्ये आघाडीचे सागर डेळेकर, भारती पाटील व एन.बी. गायकवाड हे तिघे निवडून आले. तर प्राचार्य गटातील बिनविरोध वगळता एका जागेचा निकाल दुसऱ्या टप्प्यात घोषित करण्यात आला. आघाडीचे सी. टी. कारंडे मोठ्या मताच्या फरकाने निवडून आले. यानंतर सिनेट मतमोजणी थांबवून अभ्यास मंडळांची मतमोजणी सुरू करण्यात आली. सिनेटची मतमोजणी रात्री नऊ वाजता पुन्हा सुरू करण्यात आली.

>> संबंधित वृत्त...२

2 1 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभ्यास मंडळे विकास आघाडीकडे

## मतमोजणी सुरूच; 'सुटा'ला सहा मंडळे, उर्वरित निकाल आज जाहीर होणार

**. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि न्य अधिकार मंडळांवर शिवाजी द्यापीठ विकास आघाडीने आजपर्यंत भ्यास मंडळावर असलेले शिवाजी द्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) वर्चस्व डीत काढून निर्विवाद वर्चस्व मिळवले. कूण ४७ अभ्यास मंडळांपैकी २५ भ्यास मंडळांसाठी झालेल्या निवडणुकीत कास आघाडीने १० बिनविरोध जागांसह न्य सात मंडळावर विजय मिळवला. कूण २५ अभ्यास मंडळांपैकी १७ मंडळे कास आघाडीला तर ६ मंडळे 'सुटा'ला ळाली. एका मंडळावर अपक्षाने बाजी रली असून एका गटात सुटा-आघाडी णि अपक्ष अशी समान वर्णी लागली. पूर्वी बिनविरोध निवडलेले संस्थाचालक तील सहा उमेदवार आणि बिनविरोध जागांसह प्राचार्य गटातून विजयी लेले उमेदवार आघाडीचे असल्याने थाचालक गट आणि प्राचार्य गटातही घाडीचा वरचष्मा राहिला.

अधिसभा आणि अधिकार मंडळासाठी वारी चुरशीने सरासरी ६२ टक्के मतदान ले होते. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार धसभा, अभ्यास मंडळे, प्राचार्य,



शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि अन्य अधिकार मंडळांची मतमोजणी सोमवारी रात्री उशीरापर्यंत सुरू राहिली. विद्यापीठातील परीक्षा केंद्र क्रमांक दोनमध्ये ही मोजणी सुरू होती.

### पहिला निकाल शिक्षक गटाचा

विद्यापीठ शिक्षक गटातून विद्यापीठ विकास आघाडीचे सागर डेळेकर, प्रा. भारती पाटील आणि सुप्टाचे एन. बी. गायकवाड विजयी झाले. यंदाच्या अधिसभा निवडणुकीत विकास आघाडी आणि विद्यापीठ विकास मंच यांच्यात मैत्रीपूर्ण लढती झाल्या. पहिलाच निकाल विद्यापीठ शिक्षक गटाचा जाहीर झाला. या गटात तीन जागेसाठी ९ उमेदवार रिंगणात होते. त्यानंतर निकाल जाहीर होण्यास सुरुवात झाली. मात्र त्याची गती अतिशय संथ होती.

### नऊ अभ्यास मंडळांवर 'सुटा'ने केला दावा

दरम्यान, अभ्यास मंडळाच्या निवडणुकीमध्ये 'सुटा' पुरस्कृत उमेदवारांना घवघवीत यश मिळाले. सहा अभ्यास मंडळामध्ये 'सुटा'ला मताधिक्य आहे असा दावा सुटाच्यावतीने करण्यात आला आहे. या अभ्यास मंडळांमध्ये मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, इतिहास, व्यावसायिक अर्थशास्त्र व कॉमर्स या अभ्यास मंडळाचा समावेश असल्याचे पत्रक शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने प्रसिद्धीस दिले आहे. समाजशास्त्र, संख्याशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र या तीन अभ्यास मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली. त्या ठिकाणी सुटाचे प्राबल्य आहे. अशा रितीने सुटाला १८ अभ्यास मंडळापैकी नऊ अभ्यास मंडळांमध्ये मताधिक्य मिळाले आहे. इतर अभ्यास मंडळांमध्ये 'सुटा' पुरस्कृत उमेदवारांना पन्नास टक्के यश मिळाले आहे अशी माहिती सुटाचे निवडणूक समन्वयक प्रा. सुधाकर मानकर यांनी पत्रकातून दिली आहे.

### व्यावसायिक अर्थशास्त्र गटात 'सुटा'च्या कोरबूंना धक्का

अभ्यास मंडळाच्या व्यावसायिक अर्थशास्त्र या गटातून सुटा'चे सहकार्यवाह प्रा. डॉ. आर. जी. कोरबू यांना ३२ पैकी अवघी २ मतं मिळाली. कोरबू यांनी दुसऱ्या गटातूनही अर्ज भरला आहे. मात्र, अभ्यास मंडळातील गटनिहाय निवडणुकीत कोरबू यांना पराभवाचा धक्का बसल्याने सुटाची एक जागा कमी झाली.

# अभ्यास मंडळे विकास आघाडीकडे

## मतमोजणी सुरूच; 'सुटा'ला सहा मंडळे, उर्वरित निकाल आज जाहीर होणार





### पहिला निकाल शिक्षक गटाचा





### विजयी उमेदवार













# विद्यापीठात परीक्षांचे वारे...

दिल दोस्ती
Forever Friends

**दिवाळी साजरी झाली की इंजिनीअरिंग आणि इतर बऱ्याच अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना वेध लागतात ते सेमिस्टर परीक्षांचे. दिवाळीत केलेली सारी धमाल, मजा, मस्ती आता आठवणींच्या गाठोड्यात बंद करून ठेवायची असते आणि पुस्तकांना सोबतीला घेऊन परीक्षेचा डोंगर सर करायचा असतो. ऑक्टोबरच्या शेवटी परीक्षेचे वेळापत्रक व्हॉट्सअॅपवरून फिरू लागते, गावी गेलेले होस्टेलकर आता परत येऊ लागतात आणि विद्यापीठात परीक्षांचे वारे वाहू लागते**



कल्याणी आडत
डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ

परीक्षेचे वेळापत्रक पाहताच सुट्टीत आलेली सारी मरगळ झटकली जाते आणि नोट्सची जमवाजमवी सुरू होते. पेपरनुसार अभ्यासाचंही 'शेड्युल' आखलं जातं. पण ते पाळणं मात्र काही होत नाही. त्यामुळं पेपरला जाईपर्यंतसुद्धा नोट्सवरून शेवटची नजर फिरवणं सुरूच असतं. परीक्षेच्या काळात हॉस्टेल वर एक फेरफटका टाकला असता एक वेगळंच वातावरण अनुभवायला मिळतं. एरवी किलबिलाट ऐकू येणाऱ्या स्टडी रूममध्ये थोडा फार शांतता नांदत असते.

एका रूममधून दुसऱ्या रूममध्ये पुस्तकांचं आदानप्रदान होत असतं. मागील वर्षीचे पेपर्स सीनिअर्सकडून मिळवले जातात आणि कँटीनवर एकत्र बसून ते चाळले जातात. त्यातही मग नेमकं आपण बंक केलेल्या लेक्चर्समधील किंवा एखाद्या न शिकवलेल्या टॉपिक वरचेच प्रश्न दिसायला लागतात आणि मग हे टॉपिक्स मिळवण्याची एकच धांदल सुरू होते.

शिक्षकांना भेटून, सिनिअर्सचा सल्ला घेऊन किंवा मग प्रसंगी 'गुगल'बाबाला साकडं घालून ई-बुक्स मिळवले जातात. झेरॉक्सच्या दुकानासमोर रांगा लागल्या जातात. एखाद्या टॉपिकच्या नोट्स काढल्यानंतर 'अरे हा टॉपिक नको आहे का?' असं झेरॉक्सवाले काका स्वतः च विचारतात. आणि मग 'अरे आपल्यापेक्षा जास्त आपला सिलॅबस तर या काकांना माहितीये' असे भाव नकळत उमटून जातात. सायबरजवळच्या झेरॉक्स सेंटरवर या काळात एक नजर टाकली तर चहूकडे तरुणाई फुललेली दिसते.

होस्टेलवर किंवा घरी अभ्यास होत नसेल तर विद्यापीठातील ग्रंथालयाचा पर्याय वापरला जातो. शांत निसर्गरम्य वातावरणात खर्डेकर ग्रंथालयाच्या समोरील हिरवळीत बसल्यावर मनाला एक वेगळीच शांतता लाभते. सभोवती नजर टाकली असता चर्चा करून ग्रुपस्टडी करणारे अनेक मित्रमैत्रिणी दिसून येतात. कोणी एकटेच स्वतःमध्ये आणि स्वतःच्या पुस्तकामध्ये दंग झालेले अभ्यासू दिसून येतात. तर समोर पुस्तक आणि कानात हेडफोन्सच्या वायरी लटकावलेला एखादा अवलियाही दिसतो. ग्रंथालयाच्या वरील स्टडीरूममध्ये मात्र प्रचंड शांतता असते.



जसजसा परीक्षेचा दिवस जवळ येऊ लागतो तसतशी कानांवरसुद्धा पेपरच्या चर्चा ऐकू येऊ लागतात. एखादा अडलेला मुद्दा समजून घेण्यासाठी मित्रमैत्रिणींची मदत घेतली जाते, कॉलेजचं 'टाइम ड्युरेशन' वाढू लागतं. ऐनवेळी एखाद्या टॉपिकच्या नोट्सही व्हॉट्सअॅपवरूनच पाठवल्या जाऊ लागतात आणि पेपर संपल्यावर संध्याकाळच्या गुलाबी थंडीत चहावरच्या वाफाळत्या धुक्यामध्ये गप्पांची मैफिल रंगून जाते.



# सुरू आहे इंजिनीअरिंगचा कल्ला

**इंजिनीअरिंग कॉलेजांच्या सगळ्याच गोष्टी जरा 'हटके' असतात. परीक्षा ही त्यापैकी एक. वेळ कमी मिळाल्यामुळे टेंशन तर असतंच पण हा इंजिनीरिंगचा विद्यार्थी सगळं टेंशन विसरून हसतमुखाने परीक्षेला सामोरा जातो. तेवढंच काय शेवटच्या पेपरला कितीही जागरण झालेलं असलं तरी बिघडलेल्या तब्येतीने का होईना सेलिब्रेशन करतोच..!**

दिग्विजय कोण्णूर
डीकेटीई, इचलकरंजी

इंजिनीरिंग ही एक प्रगत,जलद आणि एका विशिष्ट 'साच्यात' चालणारी लाइफस्टाइल आहे, असं मला वाटतं. इथल्या सगळ्याच गोष्टी जरा 'हटके' असतात. वर्षभरात कोणत्याही एक महिन्यात इथे काय चालू असेल हे आपण सहज सांगू शकतो इतकी अचूकता घडणाऱ्या घटनांमध्येही असते. इथे घडणाऱ्या प्रत्येक गोष्टी या फक्त 'इथेच' घडू शकतात. इथे होणारे लेक्चर्स, कॉमन-ऑफ्स, इथली सबमिशन्स, इथला दंगा, इथल्या गमती, इथल्या सत्र परीक्षा... सगळ्या गोष्टींचा विषयच वेगळा.

इंजिनीरिंगच्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण सत्र हे लेक्चर्स, प्रॅक्टिकल्स, प्रोजेक्ट्स, प्रेझेंटेशन मध्ये जाते. मध्ये खूप सारे कॉमन-ऑफ, जोडून आल्या म्हणून घेतलेल्या सुट्ट्या, कॉलेज बाहेरील विविध स्पर्धा यामुळे खूप सबमिशन राहिलेलं असतं. आणि शेवटी ते येतं ते इंटर्नल तोंडी परीक्षेच्या वेळी..! मग येतात एक्सटर्नल तोंडी परीक्षा..! त्यामुळे अभ्यास करण्यासाठी असलेली सुट्टी (पीएल) फार थोडी उरते... आणि हे अगदी दरवर्षीचंच.. काही बदल नाही..! त्यामुळे 'सत्रपरीक्षा' हा जणू एक 'रणसंग्राम' असतो.

वेळ कमी मिळाल्यामुळे टेन्शन तर असतंच पण हा इंजिनीरिंगचा विद्यार्थी सगळं टेन्शन विसरून हसतमुखाने परीक्षेला समोर जातो. तेवढंच काय शेवटच्या पेपरला कितीही जागरण झालेलं असलं तरी बिघडलेल्या तब्येतीने का होईना सेलिब्रेशन करतोच..! कारण... हे असंच असतं सेमिस्टर पुढे जातात. इंजिनीरिंग पूर्ण होतं, पण सत्र परीक्षेचा हा थरार मात्र वर्षानुवर्षे तसाच राहतो.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि अधिकार मंडळांच्या मतमोजणीत व्यस्त असलेले अधिकारी आणि प्रतिनिधी, तर दुसऱ्या छायाचित्रात जल्लोष करताना विजयी उमेदवार आणि त्यांचे समर्थक. (सर्व छाया : एस. अली)

# अधिकार मंडळांवर सुटाचे वर्चस्व

## २१ जागा जिंकल्या; विकास आघाडीला २०, तर अपक्षांची ४ ठिकाणी बाजी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीत झालेल्या मतमोजणीस सोमवारी सकाळी आठ वाजता प्रारंभ झाला. सकाळी दहा वाजल्यानंतर निकाल जाहीर होण्यास सुरुवात झाली. सायंकाळपर्यंत लागलेल्या निकालात ४५ जागांपैकी २१ जागा जिंकत सुटाने अधिकार मंडळावर वर्चस्व सिद्ध केले. विकास आघाडीला २० जागा मिळाल तर ४ ठिकाणी अपक्षांनी बाजी मारली. विजयी उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी विद्यापीठ आवारात जल्लोष केला.

विद्यापीठाच्या परीक्षा विभाग २ क्रमांक इमारतीमध्ये मतमोजणी झाली. विद्यापीठ



कार्यक्षेत्रातील तीन्ही जिल्ह्यांतील शैक्षणिक क्षेत्रातील लोकांना निकालांची उत्सुकता लागून राहिली होती. महिनाभरापासून निवडणुकांमुळे कोल्हापूरसह सांगली आणि सातारा या जिल्ह्यांतील वातावरण ढवळून निघाले होते. यंदा प्रथमच नवीन विद्यापीठ कायद्यानुसार निवडणूक होत असल्याने नवीन कायदा आणि त्यानुसार मिळणारे अधिकार समजून घेत अनेकांनी निवडणुकीची तयारी केली होती. सुटाविरोधात सर्व अशी मोट बांधण्यात आली होती. शिवाजी विद्यापीठ विचार मंच आणि शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी यांच्यामध्ये अनेक गटांमध्ये मैत्रीपूर्ण लढती झाल्या, तर शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ अर्थात सुटामध्ये निवडणुकीच्या दरम्यानच अंतर्गत वाद उफाळून आला. त्यामुळे निवडणूक रंगतदार बनली होती. प्रत्येक गटाने आपणच विजयी होणार असल्याचा दावा केला होता. ▶▶ पान २ वर

### फोनवरूनच निकाल

बहुतांश उमेदवार मतमोजणीच्या ठिकाणी फिरकले नसल्याने केंद्रावर दिवसभर शुकशुकाटच होता. बहुतेक उमेदवार आपल्या गटाची मतमोजणी केव्हा होणार, याचा अंदाज घेऊन त्या वेळेत येत होते, तर अनेक उमेदवारांनी मतमोजणीसाठी विद्यापीठात येण्याचे टाळले. हे उमेदवार फोनवरूनच माहिती घेत होते. त्यामुळे विजयी झाल्याचा निरोप मिळताच उमेदवार आपापल्या महाविद्यालयातच जल्लोष करत होते. त्यामुळे मतमोजणी कोल्हापुरात, तर जल्लोष सांगली आणि साताऱ्यात अशी परिस्थिती होती.

### मते बादचे प्रमाण अधिक

अधिसभा आणि अधिकार मंडळांची निवडणूक मतपत्रिकांवर घेण्यात आली होती; मात्र जवळपासच सर्वच गटांमध्ये मते बाद होण्याचे प्रमाण मोठे होते. काही गटांमध्ये अगदी तीसपैकी पाच ते सहा मते बाद होत होती. त्यामुळे अनेकदा उमेदवारांकडून फेरमतमोजणीची मागणी करण्यात येत होती. फेरमतमोजणीमुळे मतमोजणी प्रक्रिया संथगतीने होती.



### कुलगुरूंची भेट

सकाळी दहा वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मतमोजणी केंद्रास भेट दिली. यावेळी त्यांनी मतमोजणी प्रक्रियेची माहिती घेतली. आवश्यक सूचना मतमोजणी प्रक्रियेमध्ये सहभागी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी दिल्या.

### विभागनिहाय विजयी उमेदवार

▶ **गणित**

| | | |
|---|---|---|
| हंबीरराव शिंदे | सुटा | ५ |
| नवनीत सांगले | विकास आघाडी | ५ |
| दिलीप हासबे | विकास आघाडी | ३ |

▶ **व्यवस्थापन**

| | | |
|---|---|---|
| दत्तात्रय चावरे | विकास आघाडी | ५ |
| शंकर सारंग | विकास आघाडी | ५ |
| रवींद्र तेली | सुटा | ७ |

▶ **मायक्रोबायोलॉजी**

| | | |
|---|---|---|
| एच. व्ही. देशमुख | विकास आघाडी | ३ |
| ए. आर. जधाव | सुटा | ३ |
| एस. एस. सुपनेकर | सुटा | ३ |

▶ **बिझनेस इकॉनॉमी**

| | | |
|---|---|---|
| व्ही. एम. माळकर | सुटा | १४ |
| बी. के. माने | सुटा | ९ |
| व्ही. एम. कुंभार | सुटा | ७ |

▶ **इंग्रजी**

| | | |
|---|---|---|
| एस. बी. भांबरे | विकास आघाडी | २८ |
| एन. पी. खवरे | विकास आघाडी | २५ |
| आर. एस. पोंडे | सुटा | २० |

▶ **इतिहास**

| | | |
|---|---|---|
| एन. ए. वरेकर | सुटा | ३५ |
| एम. ए. चव्हाण | सुटा | १९ |
| राजश्री निकम | सुटा | १८ |

▶ **बॉटनी**

| | | |
|---|---|---|
| व्ही. सी. कारंडे | विकास आघाडी | ९ |
| एम. बी. वाघमारे | विकास आघाडी | ९ |
| ए. पी. सादळे | विकास आघाडी | ७ |